नि.फौ.ख. क्र. २८४/२०१९

<u>नि. क्र. ३३</u>

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

शपथेवर सत्य निवेदन करतो की,

**नाव** – **विशाल गोविंद रणक्षेत्रे**

**वय** – ३० वर्षे, **व्यवसाय**– मजूरी,

**राहणार** – कुमठा खु., ता. उदगीर, जि. लातूर.

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास विशेष सहा. सरकारी विधिज्ञ श्री. के. टी. उगलमुगले यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

दि.१८/०१/२०१८ रोजी मी कोठे होतो, मला आठवत नाही. पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. पोलिसांनी माझी पंचनाम्यावर सही घेतली. आता मला पंचनामा दाखविला. त्यातील मजकूर मला सांगता येणार नाही. त्या पंचनाम्यावर माझी सही आहे. त्या सहीस **नि.क्र.३४** देण्यात येते. असे काही घडले नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष पंचनामा तयार करून त्यावर माझी सही घेतली.

**(सरकारी वकिलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा कायदा कलम १५४ अन्वये सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी आणि फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पद्धतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.)**

माझे शिक्षण इयत्ता ८ वी पर्यंत झाले आहे. कोणत्याही कागदावर सही करण्यापूर्वी वाचून पाहतो. आरोपी माझ्या गावातील रहिवाशी आहेत. आरोपी माझे भावकी आहेत. आरोपीसोबत माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञांनी नाकारला.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2025.12.16 17:56:38 +0530

**( के. ए. यादव )**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

दिनांक :– १६/१२/२०२५ (न्यायालय क्र.२) उदगीर